प्रभाकर बरवे

# चित्र

मूलतः चित्रकाराला चित्र काढावेसे का वाटते, ह्या मूळ प्रवृत्तीचा शोध घेता आला तर चित्र आणि आशय यांचा चित्रकाराच्या मनांत, परस्पर संबंध काय व कसा असतो, याचा काही अंशी उलगडा होऊ शकेल. अनेक बाह्य कारणांनी चित्रकाराच्या मनांत ईर्षा, स्फूर्ती, महत्वाकांक्षा किंवा आणखी काही भावना उत्पन्न होत असली तरी, प्रत्यक्ष चित्र काढण्यास किंवा तरंगविण्यास उद्युक्त करणारी शक्ती, ही चित्रकाराची अंतःस्फूर्ती असते या शंका नाही. ही अंत:प्रवृत्ती निव्वळ बाह्य कारणांनी जोपासता येत नाही, याचा प्रत्यय चित्रकाराला, त्याच्या कलाकृतीच्या कसाचा विचारा करताना, अवश्य येतो. अंतःस्फूर्तीतून निर्माण झालेली कलाकृती आणि केवळ बाह्य कारणांस्तव मुद्दाम निर्माण केली गेलेली कलाकृती यांच्या तुलनेत, हा फरक स्पष्टपणे जाणवतो. कलाकृतीच्या अभिव्यक्तितील सच्चेपणा हा उत्स्फूर्ततेवरच अवलंबून असतो या बाबत दुमत होण्याचे कारण नाही. कारण उत्स्फूर्त अशा अभिव्यक्तिमध्ये हेतूशुद्धता ही आपोआपच सामावलेली असते.

अगदी सुरवातीला 'मला चित्र काढता येते' यातच खूप मोठा आनंद असतो. चित्रकाराला त्याच्या अवतीभोवती असलेल्या वातावरणातून, जे आवडते, जे त्याचे लक्ष वेधून घेते, मग ते दुसऱ्याने काढलेले चित्र असो, छायाचित्र असो, व्यक्ती, स्थळ, वस्तू किंवा आणखी काही, असा कोणताही घटक, ज्याची तो चित्रकार त्याच्या कुवतीप्रमाणे रेषा रंगातून प्रतिकृती निर्माण करू शकतो, अशी प्रतिकृती निर्माण करता येते याचाच तो आनंद असतो. लहान मुलांच्या चित्रात मूलतः हाच आशय असतो. गुहेत रहाणाऱ्या अश्मयुगातील मानवाला, दगडी भिंतीवर वन्य प्राण्यांची, शिकारीची, चित्रे कोरताना, याच आनंदाचा प्रत्यय आला असावा. मला स्वतःला लहानपणी, प्रथम घड्याळ समजू लागले तेव्हां, आणि कोळशाने ओढलेल्या रेघोट्यातून, चित्र काढता येऊ लागले तेव्हां झालेला आनंद आजही स्पष्टपणे आठवतो. चित्र काढण्याची ही उर्मी आतून येते. चित्रकार अगदी सुरवातीपासून प्रथम त्याच्या अवतीभवती 'पहावयास' शिकतो. त्याच्या नकळत हळूहळू 'पहाणे' हेच त्याच्या अनुभवाचे मुख्य अंग होऊ लागते. तोच त्याच्या मनात रुजणारा, पहिला चित्र-संस्कार असतो.

प्रगत चित्रकलेमध्ये, चित्रकृती ही आणखी कशाची केवळ प्रतिकृती नसून, चित्रकाराची ती स्वतंत्र अभिव्यक्ती आहे असा विचार रूढ होऊन, त्यातून सहाजिकच कलाकृतीतून व्यक्त होणारा आशय महत्वाचा ठरून, चित्र, त्याचे प्रयोजन आणि त्यातून व्यक्त होणारा आशय, यांचा परस्पर संबंध काय व कसा आहे याचे कुतूहल वाढत जाते. कोणत्याही प्रकारच्या प्रतिकृतीमध्ये कौशल्याचा वाटा अधिक असला तरी प्रत्यक्ष सृजनाला अधिक वाव मिळत नाही. शिवाय सृजनक्रियेत कौशल्याचा सहभाग असला तरी, निव्वळ कौशल्य म्हणजे 'सृजन' असे म्हणता येणार नाही. कौशल्यपूर्ण कारागिरी आणि स्वतंत्र सृजनशील अभिव्यक्ती यातला फरक एकदा लक्षात आल्यावर, प्रतिकृतीच्या पुनरावृत्तीपेक्षा नवनिर्मितीच्या शक्यता असलेल्या स्वतंत्र अभिव्यक्तीकडे चित्रकाराने वळणे हे अगदी स्वाभाविक आहे. त्यामुळे अभिजात चित्रकलेच्या क्षेत्रात नवनिर्मितीच्या अनेक दिशा मोकळया होऊन, चित्रकला प्रतिकृतीच्या व्याख्येशी सीमित न होता, मुक्तपणे ती नवनवीन क्षितिजे शोधावयास उद्युक्त करते.

वास्तविक, चित्र म्हणजे काय ? चित्रकला म्हणजे काय ? हे प्रश्न पुनःपुन्हा निर्माण होणारे आहेत. जागृत चित्रकाराला ते नेहमीच सतावीत असतात. कारण चित्राचा मूलभूत पाया म्हणजे दृश्य-अदृश्याचा खेळ; तो इतका गहन आहे की त्यातून नित्य नव्या दृश्य शक्यतांचा उगम होत असतो. ह्या शक्यतांचा मागोवा घेत पुढे जावयाचे म्हणजे एकच आयुष्य काय, अनेक आयुष्ये पुरणार नाहीत इतका तो सर्वव्यापी आहे. रेषा, बिंदु, चिन्ह, यातून उद्भवणारे आकार, त्या आकारात सामावलेली सूचकता, अदृश्यता, अमूर्तता, त्याचप्रमाणे रंगलेपन, रंगच्छटा, रंगांचे शरीर-घन, तरल, विरल, पारदर्शक, अशा अगणित शक्यता एकमेकीत गुंतलेल्या, आणि तो अवकाश, सर्व सामावलेला, सर्व सामावून घेणारा, सर्व समावेशक. ह्या सर्व घटकांच्या एकत्रित परिणामातून व्यक्त होणारा आशय कोणता ? हा प्रश्न जीवनाचा अर्थ काय ? अशा स्वरूपाचा आणि प्रत्यक्ष जीवनाइतकाच व्यापक आणि गहन

आहे.

चित्रकाराला त्याच्या अेकूण जीवनानुभवातून जो आशय किंवा अर्थ गवसतो, तो त्याच्या कलाकृतीतून कळत नकळत व्यक्त होत असतो. त्यामुळे नेहमीच त्याला अशा आशयाचे (व तेही चित्राच्या आरंभापासून) पूर्ण भान असते, असे म्हणता येणार नाही. कारण मूलतः दृश्यानुभव व त्यातून निर्माण होणारा सौंदर्यानुभव, हाच त्याच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा अनुभव असतो. याचे कारण असे की, चित्रकार जे काही अनुभवतो ते केवळ दृश्यरूपातून कसे व्यक्त करावयाचे हा त्याच्या पुढील मूळ प्रश्न असतो. मात्र याचा अर्थ असा नाही की चित्रकाराला, चित्रातन व्यक्त होणाऱ्या आशयासंबंधी काहीच भान असत नाही, किंवा तो त्याच्या जीवनानुभवातून जावणलेल्या आशयासंबंधी पूर्णपणे अनभिज्ञ असतो. परंतु त्याला गवसलेले जीवनविषयक ज्ञान, हे अेक तर दृश्यरूपात आणि तेही साररूप असे असल्यामुळे, म्हणजेच मूलतः ते विचाररूपात नसल्यामुळे, त्यातल्या आशयाची त्याला रूढ अशा शब्द संदर्भात उकल होणे कठीण होते. काव्यात किंवा अन्य साहित्यप्रकारातून प्रगट होते तसे, ज्ञान येथे विचाररूपात प्रगट होत नसल्यामुळे, ते अप्रत्यक्षरित्या म्हणजे प्रथम दृश्यातून, नंतर त्यातून सूचित होणाऱ्या जीवनविषयक अनुभवातून प्रगट होते. त्यामुळे चित्रातून सूचित होणारा आशय, ह्या संदर्भात, साहित्यकृतीतून प्रगट होणाऱ्या आशयापेक्षा अगदी भिन्न स्वरूपाचा असतो असे म्हणता येईल.

चित्रातून प्रगट होणाऱ्या आशयाचे स्वरूप भिन्न असण्याचे आणखी अेक कारण असे की, चित्र काढण्याचे प्रयोजन निव्वळ वैचारिक नसते, तर बहुधा ते चित्रकाराला त्याच्या जीवनात जाणवलेल्या अेखाद्या दृक्प्रत्ययातून उत्पन्न होत असल्यामुळे, त्यातून प्रगट होणाऱ्या आशयाचे रूप सहाजिकच भिन्न ठरते. अशा दृक्प्रत्ययाचे प्रत्यक्ष चित्रात प्रगटीकरण होताना, चित्रकाराला त्याच्या चित्रकलेतील प्रभुत्वाचा उपयोग होतो. मात्र सकृतदर्शनी वाटते तसे निव्वळ तंत्रनैपुण्य म्हणजे हे प्रभुत्व नव्हे, तर चित्रकलेच्या विविध बाजूंचा प्रत्यक्ष कृतीतून केलेला विचार आणि अभ्यास, चित्रकलेच्या अेकूण इतिहासाचे भान, आणि ह्या सर्व अनुभवातून, तसेच प्रत्यक्ष कृतीतील यशापयशातून हळूहळू दृढ होत जाणारा त्याचा स्वतःचा दृष्टिकोन, म्हणजे चित्रकाराचे चित्रकलेतील प्रभुत्व असे म्हणता येईल. ह्या साऱ्या अनुभवातून त्याचा दृक्प्रत्यय प्रगल्भ होत जातो. मात्र त्याच वेळी त्याचे चित्र, सकृतदर्शनी अधिकाधिक साधेसोपे दिसू लागते. कारण शुद्ध दृश्यरूपाव्यतिरिक्त अन्य अलंकारिक संदर्भ आपोआपच नाहीसे होतात, त्यांची गरज उरत नाही.

आरसा आणि त्यातील माया, प्रतिमाया वगैरे कल्पना साहित्यात सुंदर प्रतिमा निर्माण करू शकतात. चित्रात मात्र त्या तशा वाटत नाहीत. याचे मुख्य कारण असे की, बिंब-प्रतिबिंब ह्या रहस्याचा उलगडा नाना प्रकारानी चित्रात आपोआपच होत असतो, कारण बिंब-प्रतिबिंब ही कल्पना मूलतः दृश्य असल्यामुळे त्यातील बहुतेक शक्यता आजपर्यंत अजमावल्या गेल्या आहेत. शिवाय आकाराची सर्व बाजूनी शक्य असलेली 'लवचिकता' चित्रकार नेहमीच लक्षात घेतो. अेकच आकार निरनिराळ्या तऱ्हेने वाकवून, लांबवून, रुंदावून, फिकट किंवा गडद रंगवून, काही भाग अदृश्य ठेवून, वगैरे अनेक प्रकारे चित्रात व्यक्त होऊन शकतो. हे सर्व होत असताना, आकाराची मूळ ओळख बदलत नाही. आकाराच्या ह्या सर्व शक्यता चित्रात सहजपणे व्यक्त होत असतात, आणि म्हणून 'आरसा' ह्या प्रतिमेचे साहित्यिक संदर्भ येथे उपयुक्त ठरत नाहीत. त्यामुळे चित्र संदर्भात दृश्यअदृश्याचा विचार अगदी वेगळा स्वतंत्र होतो. साहित्यात दृश्ये वाचकाच्या स्वानुभवाने निर्माण होतात, परंतु चित्रात प्रत्यक्ष रूपच व्यक्त होत असल्यामुळे प्रेक्षकाला ते स्वातंत्र्य नसते, मात्र व्यक्त रूपाचे संदर्भ आणि अर्थ हे प्रेक्षकाच्या स्वानुभवावर अवलंबून असतात.

वास्तविक प्रत्येक वास्तव आकाराला अर्थ असतो, परंतु चित्रकाराची खरी कसोटी आकाराच्या अर्थात गुंतून न पडता, तो आकार अर्थापासून जितका स्वतंत्र होत जाईल, तितका तो स्वतंत्र करणे यामध्ये आहे. कारण अर्थ आकाराच्या ओळखीतून निर्माण होतो. ते सहाजिक आहे. परंतु त्या ओळखीबरोबरच अन्य अर्थ-संदर्भही प्रगटतात, बहुधा ते प्रतिकात्मक असतात. ही प्रतिके साहित्यिक अंगाने रूढ झालेली असतात. त्यामुळे प्रत्यक्ष आकाराच्या दृश्यरूपापेक्षा त्याचा प्रतिकात्मक अर्थ जास्त महत्वाचा ठरतो. अशतऱ्हेने अर्थ आणि संदर्भ आकाराला चित्रापासून म्हणजे त्याच्या मूल दृश्यगुणापासून दूर नेतात. म्हणून आकाराच्या अर्थात गुंतून न पडता, केवळ चित्रावकाशाच्या संदर्भात त्या आकाराकडे वस्तुनिष्ठतेने पाहून फक्त चित्रसंदर्भात त्या आकाराचे मूल्यमापन करणे आवश्यक ठरते.

चित्रातून व्यक्त होणारा आशय आणि चित्रावकाशाची विशिष्ठ मागणी, यामध्ये जेव्हा विरोध निर्माण होतो, तेव्हा चित्रकाराला अेक वेळ आशयाला काही अंशी मुरड घालून, चित्रावकाशाच्या मागणीलाच प्राधान्य द्यावे लागते. कारण आशय हा चित्रकाराच्या अेकंदर विचारांचा परिपाक असतो, भावना व कल्पना यांच्या मिश्रणातून त्याला आशय स्फुरतो किंवा जाणवतो. असे असले तरी त्यात दृश्य दृष्ट्या काही उणीवा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय आशयासंबंधीचा अेकूण विचार (किंवा कल्पना) हा देश, काल, स्थिती वगैरे घटकांवरही अवलंबून असतो. चित्रावकाशात सुचणाऱ्या दृश्य शक्यता मात्र प्रत्यक्ष कृतीतून निर्माण झालेल्या आणि उत्स्फूर्त अशा असतात. त्यामुळे चित्रावकाशाची मागणी ही कोणत्याही परिस्थितीत योग्य ठरते, कारण, अशा मागणीला देश, कला, स्थितीचे किंवा अन्य कोणतेही बंधन असत नाही. त्यामुळे अशा तऱ्हेच्या मुक्त आविष्काराला सहाजिकच प्राधान्य मिळते. पूर्व नियोजित आशयाच्या मर्यादित रूपापेक्षा, प्रत्यक्ष चित्रावकाशातून स्फुरलेल्या दृश्य शक्यतातून उमटणारा आशय, हा केव्हाही अधिक व्यापक व महत्वपूर्ण असणे स्वाभाविक आहे.

कधी चित्रकार त्याने अनुभविलेला केवळ सौंदर्यानुभव चित्रातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. अशा कलाकृतीमध्ये केवळ सौंदर्यानुभव हाच त्या कलाकृतीचा आशय असतो. अेखाद्या शिल्पकाराला, काष्ठशिल्प घडवित असताना, केवळ त्या काष्ठसौंदर्याचा प्रत्यय आला तर त्या प्रत्ययाखेरीज आणखी काही आशय शोधण्याची गरज भासेल का ? म्हणजे अेखाद्या कलाकाराला त्या कलापदार्थातच मूलभूत असा सौंदर्यप्रत्यय आला तर त्या प्रत्ययाखेरीज आणखी काही आशय शोधण्याची गरज भासेल का ? म्हणजे अेखाद्या कलाकाराला त्या कलापदार्थातच मूलभूत असा सौंदर्यप्रत्यय जाणवला तर तोच त्या कलाकृतीचा आशय होतो. कारण लाकडाचे लाकूडपण (त्याच्या सर्व वृक्षजन्य तपशीलामुळे), दगडाचे दगडीपण, कॅनव्हासचा पोत, किंवा रंगाचे पदार्थ म्हणून असलेले वैशिष्ठ्य, यातच त्या त्या पदार्थाचे वैशिष्ठ्य आणि सौंदर्य भरलेले असते. (एका युरोपियन चित्रकाराने पांढऱ्या स्वच्छ काचपात्रात निरनिराळ्या रंगांच्या पावडरी कमी जास्त प्रमाणात भरुन, ती काचपात्रे अेका

विशिष्ठ क्रमाने अेकापुढे अेक मांडून, 'सा-रे-गमपधनीसा' सारखा, त्यांतून अेक दृश्य परिणाम साधला होता. हे प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी मध्ये भरले होते.) सौंदर्यानुभव हा केवळ कल्पनेत सीमित नसून तो शाब्दिक, ध्वन्य, रुपात्मक अशा अनेक अंगांनी प्रतीत होत असल्यामुळे, तो केवळ संवेदनेतून, म्हणजे पदार्थाच्या केवळ संवेदनाजन्य अनुभवातूनही प्रतीत होतो. जेथे विचार पोहोचत नाही, परंतु प्रत्यक्ष संवेदना मात्र असते, असा शुद्ध संवेदनाजन्य सौंदर्यानुभव हाही कलाकृतीचा आशय असू शकतो.

अमूर्त चित्राच्या संदर्भात कधी 'शुद्ध दृश्यानुभव' इतकाच आशय उरतो. मूलतः आशय हा मूर्त आहे की अमूर्त ? तो अमूर्त असेल तर त्यात आपण कोणत्या प्रकारचा अर्थ शोधतो ? येथे मला असे वाटते की प्रत्येक मूर्त रूपातच अमूर्तता सामावलेली आहे. त्याचप्रमाणे अमूर्तरूपात मूर्त कल्पना सामावलेली असणे शक्य आहे. शुद्ध दृश्यानुभवाच्या विचार करताना असे जाणवते की, जे संदिग्ध दिसते तेच वास्तविक अर्थस्पष्ट असते, व जे स्पष्ट दिसते त्याचा अर्थ मात्र संदिग्ध असू शकतो. म्हणजे अेकप्रकारे हा रूप आणि कल्पना यांचा परस्पर संबंध आहे. यामुळे जसजसे आपण अमूर्त चित्राच्या संदर्भात खोल जाऊ तसतसा त्यातून व्यक्त होणारा आशय स्थूल किंवा व्यापक असेल असे आपल्या लक्षात येते. म्हणून येथे विशिष्ठ स्वरूपाचा आशय शोधता येणार नाही, तर 'शुद्ध दृश्यानुभव' असेच त्याचे स्वरूप असेल.

चित्रातील आशयासंबंधी विचार करताना साहजिकच आपण ज्या कल्पनेतून हा आशय व्यक्त होतो, त्या कल्पनेकडे येतो. चित्रकलेच्या संदर्भात मला असे वाटते की, मनापासून घडलेला, कोणत्याही कल्पनेचा प्रत्यक्ष चित्रात घडणारा प्रथम आविष्कार, हाच सर्वात योग्य ठरतो. त्यानंतर त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्यास त्या सुधारणा मूळ चित्राविष्काराच्या तुलनेत कृत्रिम आणि बांडगुळासारख्या अनावश्यक वाटू लागतात. अेखाद्या शास्त्रीय प्रयोगात हळूहळू सुधारणा घडवून काही ठाम निष्कर्षाप्रत पोहोचणे कदाचित शक्य होत असावे. कलेमध्ये मात्र अशा सुधारणांना वाव नाही असे वाटते. त्याचे कारण असे की, प्रत्येक प्रथम आविष्कारात साठविलेले 'अेक जिनसी' सौंदर्य, त्याच आविष्काराच्या सुधारून केलेल्या प्रयोगात आढळत नाही. म्हणजे कलेच्या प्रांतात, अमूक अेक विशिष्ठ काल जो 'सृजनात्मक' असतो, तो फारसा लांबवता येत नाही. मनात वावरणाऱ्या कल्पनेचे चित्ररूप, चित्रावकाशात क्षणार्धात दिसते, ते जसे दिसले तसे प्रत्यक्ष कृतीत आणताना सहाजिकच अेकप्रकारची अटळ अशी घाई होते. तेव्हा त्या प्रत्यक्ष क्रियेत जे घडते, तेच योग्य असते. नंतर त्यात सुधारणा घडवू गेल्यास त्यातील 'उत्स्फूर्तता' नष्ट होते. म्हणून कल्पनेच्या प्रथमाविष्काराला इतके महत्व प्राप्त होते.

त्याचप्रमाणे चित्रकल्पना ही अनेकदा तपासून घ्यावी लागते. कारण कल्पनेचे चातुर्य फसवे असते. वास्तविक ही चतुरता म्हणजे ते त्या कल्पनेचे नकारात्मक रूपच असते. अशी कल्पना चित्रात प्रथमदर्शनी कितीही आकर्षक भासली तरी मुळाशी दडलेले हे चातुर्य लपून रहात नाही. अशा चातुर्यामुळे कल्पना अतिरेकी होते. वास्तविक चित्रात कोणत्याही अेक घटकाचा किंवा घटनेचा अतिरेक खपत नाही. कारण त्यामुळे पूर्ण चित्रपरिणामाला म्हणजे पर्यायाने आशयाला बाधा येते. म्हणून कल्पनेच्या मूळ रूपाकडे, जे कदाचित फारसे आकर्षक नसले तरीही, चित्रकाराने वळणे अत्यावश्यक ठरते. त्या मूळ ओबडधोबड रूपातच अनेक सुप्तगुण (आशयसंपन्नतेच्या दृष्टीने) असण्याची शक्यता असते. कदाचित हे गुण प्रथमदर्शनी लक्षात येत नाहीत, परंतु चित्र (कलाकृती) जसजसे प्रगत होत जाते तसे ते आपोआप प्रगट होऊ लागतात. अेकूण प्रत्येक ठिकाणी साधेपणा, सोपेपणा हे गुणच ठरतात. असा साधेपणा शोधणे आणि तो जपणे चित्राशयाच्या दृष्टीनेही आवश्यक ठरते.

मूळ चित्रकल्पनेपासून प्रत्यक्ष प्रतिमेपर्यंतच्या प्रवासात असे अनेक मोह उत्पन्न होतात, ते टाळावे लागतात. मनात कल्पना आली की लगेच तिचे चित्र होत नाही, त्यासाठी कधी बराच कालावधी लागतो. अधेमधे येणारे हे मोहाचे अडथळे टाळीत चित्रकार पुढे जाऊ लागला की त्याला हळूहळू शुद्ध दृश्यानुभवाचा अनुभव येऊ लागतो. असा हा शुद्ध दृश्यानुभव हाच, दुसऱ्या अंगाने चित्राचा संपन्न असा आशय होतो.

कधी असा अनुभव येतो की जे बाहेर दिसते ते वास्तविक आधीच मनात वसत असते. किंबहुना ते मनात असते म्हणूनच त्याचा बाह्य जगात प्रत्यय येतो. कलादृष्टी ही ह्या अर्थाने अंतर्दृष्टी आहे. ती नीरसात रस उत्पन्न करते. निरर्थकातला अर्थ शोधते, पहाते. आपण नेहमी पहातो त्या पहाण्यात आणि ह्या पहाण्यात (किंवा दिसण्यात) काहीसा फरक आहे. येथे वस्तूचे अेकप्रकारे समग्र दर्शन होऊन, त्या वस्तूचे अदृश्य किंवा अज्ञात असे आणखी अेखादे रूप स्पष्टपणे दिसू लागते. अशा तऱ्हेने अेखादे दडलेले रूप शोधून ते चित्रातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे, म्हणजेच अेक नवा 'दृश्यानुभव' निर्माण करणे. चित्राचे निव्वळ हेच प्रयोजन असणे, असाही अेक आशय कलाकृतिमध्ये असू शकतो.

याच दिशेने पुढे जाऊन केवळ अमूर्ताचा शोध घेताना, चित्रातील अेकूण चित्रमयताच शुद्ध आशयाच्या संदर्भात बाधक वाटू लागते. वस्तुनिष्ठ दर्शनाचा पाठपुरावा करताना, चित्रात काय आहे याचबरोबर चित्रात काय नाही हे ही महत्वाचे ठरू लागते. कारण चित्रमयता ही अेकप्रकारे केवळ वरवरचे रंजन करू शकते, परंतु ती अंतर्मुख होण्यास मदत करीत नाही. मोहक, आकर्षक रंग किंवा लालित्यपूर्ण आकार हे फार तर चित्राची रंजकता, आकर्षकता यामध्ये भर घालतील, परंतु ते संपूर्ण चित्रपरिणामापासून प्रेक्षकाला दूर नेतील. चित्राच्या गाभ्याकडे म्हणजेच आशयाकडे जाण्यास मदत करणार नाहीत, तर ते चित्रपृष्ठावरच दृष्टी खिळवून ठेवतील. अशा चित्रमयतेच्या मोहापासून अलिप्त राहून साधलेल्या संयमामुळे चित्रात अेक शुद्ध साधेपणा येऊ शकतो, निव्वळ अशा साधेपणाचा शोध घेत रहाणे, हाही चित्राच्या आशयाशी निगडीत असा अेक शोध असू शकतो. त्यामुळे प्रथमदर्शनी आकर्षक नसलेल्या कलाकृतीमध्ये असलेला आशय, ती कलाकृती वारंवार पाहिल्याखेरीज, सहजपणे लक्षात येईल असे नाही. अशा कलाकृतीतील आशय हळूहळू उलगडत असतो.

चित्रातून व्यक्त होणारा आशय; रंग, आकार, अवकाश यांच्या संमेलनातून साधणाऱ्या अेकत्रित परिणामातून प्रतीत होतो. हे सर्व घटक अेकेक करूनही पहाता येतात, किंवा अेकानंतर दुसरा अशा क्रमानेही पहाता येतात. मात्र पुनःपुन्हा आपण संपूर्ण चित्राच्या अेकत्रित परिणामाकडे (दृश्य) परत येतो. घटनांप्रमाणे येथील दृश्यघटना अेकानंतर अेक अशा कालसंदर्भात पहाता येत नाहीत. किंवा त्याप्रकारचा कालसंदर्भच येथे अस्तित्वात नसल्यामुळे, चित्रातील अेक घटक किंवा घटना वेगळी पहात असतानाच, संपूर्ण चित्राचा संदर्भही अस्पष्टपणे दिसत रहातो. त्यामुळे चित्राकृतिशी तद्रूप होताना, चित्राचा तपशील आणि संपूर्ण चित्र अेकाचवेळी जाणवतात. मात्र दोन्ही माध्यमांमध्ये अेक घटक समान असतो (किंवा कलेच्या सर्व

माध्यमांबद्दलही असेच म्हणता येईल) आणि तो म्हणजे, आस्वादकाला, आस्वादनानंतर रेंगाळणाऱ्या स्मृतीतून अनुभवास येणारा, त्या कलाकृतीचा आणि पर्यायाने तीतून व्यक्त होणाऱ्या आशयाचा पुनःप्रत्यय. हा प्रत्यय सर्वत्र सारखाच प्रभावी असतो असे म्हणता येईल.

संगीतामध्ये गायक आणि श्रोता अेकाच वेळी गायनाशी तद्रूप होऊ शकतात, आणि त्या तल्लीनतेतून गायनाचा आस्वाद घेताना त्यातून अनुभवास येणारा त्या गायकीचा आशय श्रोत्यापर्यंत पोहोचतो. अशा रितीने नादाशी अेकरूप होऊन स्वतःला विसरणे, हाच मूलतः गायनातला आशय असू शकतो, म्हणजे तेथे आस्वाद हाच आशय होतो. मात्र जर गायक स्वतःच गायनाशी तद्रूप होऊ शकला नाही तर श्रोताही तल्लीन होऊ शकत नाही. चित्रामध्ये हा आस्वादकाल वेगळा असला तरी अंतिम परिणाम मात्र तसाच असतो. चित्रकार चित्रामध्ये जेव्हां निमग्न होतो तेव्हाच चित्रात उत्स्फूर्तता येते, आणि आपोआप घडून येणारा 'सहज आशय' चित्रात उतरतो. चित्रकार अशा तऱ्हेने चित्राशी समरस झाला होता किंवा नाही याची जाणीव आस्वादकाला चित्राच्या दृश्यरूपातून स्पष्टपणे होऊ शकते. त्यामुळे चित्रात अशी सहजता नसेल तर त्या चित्राच्या आस्वादात आणि आशयाच्या आकलनात सहाजिकच व्यत्यय उत्पन्न होतो. म्हणून अशा अर्थाने, चित्र म्हणजे चित्रकाराच्या अंतर्मनातील तत्कालीन (चित्र रंगविताना) स्थितीचाच आलेख असतो असे म्हटले तर त्यात अतिशयोक्त असे काही नाही. कविता अनुभवताना, प्रत्येक शब्दातून जसे कविमन प्रतिबिंबित होते त्याप्रमाणे चित्राच्या रंगारंगातून (किंवा त्यांच्या अभावातून) चित्रकाराची मनःस्थिती स्पष्टपणे जाणवते. सर्व कलाप्रकारात आशयाचे मूलभूत असे हे जे अदृश्य अधिष्ठान असते, ते त्या कलाकाराच्या तद्रुपतेची ग्वाहीच देते.

चित्र, संगीत, नाट्य, काव्य ह्या सर्व कलामध्ये वास्तविक मूलभूत प्रश्न अेकच असतो आणि तो, मानवी जीवनाच्या मर्यादा आणि त्या ओलांडून पलिकडे झेप घेण्याची मनःशक्ति, अशा दोन बिंदूशी निगडीत असतो. तो प्रश्न म्हणजे, आपण जे जगतो, पहातो, अैकतो, वाचतो त्या सर्वाचा मूलाधार काय आहे ? 'ते' काय आहे ? हा प्रश्न जरी अेकच असला तरी उत्तरे मात्र अगदी भिन्न, त्या त्या माध्यमाशी निगडीत अशा मर्यादा आणि शक्ती यांच्या वर्तुळातून उत्पन्न होणारीं अशी असतात. चित्रकाराला त्याचे उत्तर दृक्‌माध्यमातून शोधावयाचे असते. इतर माध्यमांतून निर्माण झालेली उत्तरे येथे उपयुक्त ठरत नाहीत, याचे त्याला भान असणे महत्वाचे. चित्रकाराचा विचार हा केवळ 'दृश्य विचार' हवा. शुद्ध आकार, रंग, अवकाश यांचे हे व्याकरण. त्यात अवकाश हा कर्ता, आणि आकार व रंग हे आळीपाळीने कर्म किंवा क्रियापद होतात असे म्हणता येईल. वास्तविक दृश्य व्याकरणच स्वतंत्र आहे, कारण येथे शब्द-वाक्य-अर्थ असा क्रम नसून कधी वाक्य हाच शब्द, तर कधी शब्द हाच अर्थ, अशा शक्यता निर्माण होतात.

अशा तऱ्हेने चित्राचे व्याकरण अगदी भिन्न आहे. येथे कधी केवळ आकार महत्वाचा तर कधी रंग, कधी रेखाटन पद्धती, तर कधी आलेपनाची तऱ्हा कधी केवळ रंगछटा तर कधी शुद्ध रंग, कधी स्पष्टता, कधी संदिग्धताच महत्वाची ठरते. अशा आणखी कितीतरी शक्यता. यापैकी अेक किंवा अनेक, व्यक्तिमत्वाने स्वतंत्र होतात आणि त्यामुळे चित्राला निरनिराळी परिमाणे लाभतात. कधी आकारापासून रंगच्छटा स्वतंत्र होते, तर कधी रंगापासून रेषा स्वतंत्र होते. कधी अेखाद्या आलेपनपद्धतीमुळे रंग, अवकाशापासून स्वतंत्र होतो तर कधी तो अवकाशात पूर्णपणे लुप्त होतो. ह्या सर्व शक्यतांचा विचार चित्रकार करीत असतो, हे करीत असताना आणखी नव्या शक्यता निर्माण होतात. शक्यता जितक्या जास्त, तितका त्यांचा प्रत्यक्ष उपयोग कमी, म्हणजे त्यांची निवड अधिक काटेकोरपणे आणि संयमाने करावी लागते. कारण विशिष्ठ चित्रावकाशाच्या संदर्भात कोणत्या शक्यता अधिक योग्य आहेत हे सतत तपासावे लागते. सहज घडणाऱ्या चित्रात, प्रथमदर्शनीच योग्य ती दृश्य शक्यता सापडते; परंतु असे जेव्हा होत नाही, तेव्हा अनेक शक्यता प्रत्यक्ष पडताळून त्यांची योग्यता समजावी लागते. हे सर्व काहीशा विस्ताराने सांगण्याचे कारण इतकेच की त्यातून चित्रकलेचे व्याकरण उलगडावे, आणि ह्या व्याकरणातून, चित्राचा अर्थ आणि आशय कसा प्रगत होत जातो, त्याची थोडीबहुत कल्पना यावी.

चित्र आणि आशय यांचे नाते अशा रीतीने अनेक स्तरांवर घडत असल्याचे लक्षात येते. अेक तर मूळ आशय म्हणजे चित्रकाराचा जीवनविषयक समग्र दृष्टीकोन, किंवा जीवनाकडे पहाण्याची अेक दिशा. ह्या दिशेला मूळ आशय असे म्हणता येईल. ह्याच मूळ आशयाची निरनिराळी रूपे, प्रत्येक चित्राच्या स्वप्रकृतीनुसार किंवा त्या विशिष्ठ चित्रावकाशाच्या मागणी प्रमाणे प्रगट होतात. अेकाच चित्रकाराच्या संपूर्ण चित्रसंचिताचा विचार केला तर त्यांतून त्या चित्रकाराचा जीवनविषयक दृष्टीकोन आणि अेकूण कलेच्या संदर्भात निश्चित होत गेलेली त्याची चित्रदृष्टी, यांचा अंदाज येऊ शकतो.

चित्रातून प्रगट होणारे किंवा सूचित होणारे 'आशयरूप' हे नेहमी चित्र घडण्याअगोदर निश्चित झालेले असते असे नाही. अेकूण आशयाची दिशा निश्चित झालेली असली तरी ते विविक्षित रूप मात्र, प्रत्येक चित्राच्या प्रगतीबरोबरच प्रगत होत जाते किंवा कधी बदलतही जाते. आणि म्हणूनच आशयासंबंधी अेकप्रकारची अनिश्चितता किंवा संदिग्धता सर्वत्र आढळते. कधी चित्राच्या सुरवातीला अभिप्रेत असलेले आशयाचे स्वरूप, चित्र पूर्ण झाल्यावर पूर्णपणे बदलून, चित्रकारालाही आश्चर्याचा धक्का देते, (मात्र त्यात त्याची आशयदिशा बदलत नाही.) असे होण्याचे मुख्य कारण असे की, चित्रावकाशात आकार आणि रंग याद्वारे अनेक घटक आणि दृश्य घटना घडत असताना, चित्रावकाशाच्या मागण्या, चित्राच्या अगोदर अभिप्रेत असलेल्या आशयरूपालाही छेद देऊन पुढे जातात. म्हणून संपूर्ण चित्राकार हाच आशय आहे असे म्हणावे लागते. वास्तविक आशयानुरूप चित्र घडते असा सर्वसामान्य समज आहे, परंतु त्याच्या अगदी विरूद्ध टोकाला जाऊन, चित्रानुरूप आशय घडत जातो असेही म्हणता येईल. अशा ह्या द्विस्तरीय शक्यतांमुळे, चित्र आणि आशय यांचे नाते काहीसे संदिग्ध स्वरूपाचे व गहन होत जाते.

जेव्हा निश्चित विषयाला (आशयानुरूप) चित्ररूप देण्याचा प्रयत्न होतो, तेव्हा त्याचा अनिष्ट परिणाम प्रत्यक्ष चित्ररूपावरच होतो. आणि त्यामुळे सरतेशेवटी चित्ररूपाबरोबरच आशयाचे रूपही त्या विषयापुरते सीमित होऊन, चित्राचा आशय खुरटला जातो. म्हणून अभिप्रेत आशय आणि प्रत्यक्ष चित्रानुरूप घडत जाणार आशय, यांचा जेव्हा योग्य तो समन्वय साधला जातो, तेव्हा तो आशय प्रगल्भ आणि व्यापक होतो. असा समन्वय साधणे हे सर्वस्वी चित्राकाराच्या इच्छेवर अवलंबून असते असे मला वाटत नाही. आणि त्यामुळेच प्रत्येक चित्र हे आशय संपन्न अशी थोर कलाकृती होत नाही.